# मुंबई विद्यापीठ

गुण व प्रमाणपत्र विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई :- ४०० ०९८
संदर्भ क्र/गुण व प्रमाणपत्र /३०६६/२०२३
दिनांक:- १० जानेवारी, २०२३

## परिपत्रक

विद्यापीठाच्या अधिसभेच्या पदवीधर मतदार संघाच्या मतदानासाठी मतदार यादया तयार करणेकामी विद्यापीठाकडून नाव नोंदणीची प्रक्रिया सुरु आहे, या अनुषंगाने सर्व संबधीतांना अवगत करण्यात येते की, ज्या पदवीधरांना विद्यापीठाकडून दि. २७ डिसेंबर, २०२१ रोजी व त्या पूर्वी घेतलेल्या दिक्षांत समारंभामध्ये पदवी प्रदान करण्यात आलेली असून, ते मतदार यादीत नाव नोंदणी करण्यास उत्सुक आहेत, परंतू त्यांच्याकडे पदवी प्रमाणपत्र नसल्यामुळे त्यांची नाव नोंदणी अदयाप पर्यंत होऊ शकलेली नाही, अशा पदवीधरांकरिता पदवी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यापीठाच्या परिक्षा विभागाकडे अर्ज सादर करण्यासाठी दि. १२ जानेवारी, २०२३ ते १७ जानेवारी, २०२३ या कालावधीत (सुट्टीचे दिवस वगळून) एक विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

तरी वरिल प्रमाणे संबंधीत उत्सुक पदवीधरांनी उपरोक्त कालावधी मध्ये सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ४.०० वा. या वेळेत तळ मजला, छत्रपती शिवाजी महाराज भवन, मुंबई विद्यापीठ, कलिना परिसर, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई-४०००९८, या ठिकाणी अंतिम सत्राची/वर्षाची गुणपत्रिकेसह अर्ज सादर करावेत.

त्याचप्रमाणे ज्या पदवीधरांना पदवी प्रमाणपत्र प्राप्त झाले होते, परंतू ते त्यांच्याकडून गहाळ झालेले आहे. अशा पदवीधरांना सुदधा वरिल कालावधीत दुय्यम पदवी प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अंतिम सत्राची/वर्षाची गुणपत्रिका व पोलिस प्रशासनाकडील प्रमाणपत्र गहाळ झाल्याबाबतचे दाखला व विहीत शुल्क भरणा केल्याची पावती या अभिलेखासह अर्ज हस्तपोच पदधतीने सादर करता येतील.

वरिलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या अर्जांनाअनुसरुन तयार करण्यात येणारे पदवी प्रमाणपत्र संबंधीतांना दि. २४ जानेवारी, २०२३ रोजी, तळ मजला, छत्रपती शिवाजी महाराज भवन, मुंबई विद्यापीठ, कलिना परिसर, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई-४०००९८, येथून वितरीत करण्यात येतील.

**सदर मोहीम फक्त मतदार यादीत नाव समाविष्ठ करणे शक्य व्हावे या उद्देशाने राबवण्यात येत आहे. मोहिमेच्या कालावधीनंतर प्राप्त अर्ज या मोहीमेअंतर्गत विचारात घेतले जाणार नाही. या बाबीची सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन लाभ घ्यावा.**

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Scanned with OKEN Scanner